**"राज्यातील अपंगाची ग्रामपंचायतीने नोंदणी करणेबाबत"**

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम २०१३/प्र.क्र.१५८/पंरा-३**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई. ४०० ००१
तारीख: २४ सप्टेंबर, २०१३

**प्रस्तावना -**

१९९५ च्या अपंग पूनर्वसन कायद्यानुसार अपंगाच्या कल्याणार्थ करण्यात आलेल्या महत्वपूर्ण कायद्यानुसार जिल्हा परिषद/ पंचायत समिती / ग्रामपंचायत यांना त्यांच्या अर्थसंकल्पाच्या ३% निधी हा अपंगाच्या पूनर्वसना करता खर्च करणे आवश्यक आहे, ही बाब निदर्शनास आणून त्यांनी ग्राम पंचायत स्तरावर, तालुका स्तरावर, जिल्हा स्तरावर अपंगाची माहीती उपलब्ध नसल्याने त्यांच्या कल्याणार्थ निधी अखर्चीत राहत आहे. ग्राम पंचायतीना त्यांच्या मंजूर निधीच्या ३% खर्च अपंगाच्या पूनर्वसनाकरता/कल्याणाकरता वापरता यावे शक्य व्हावे याकरता प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर ग्रामपंचायतींनी त्यांच्या गावातील प्रत्येक अपंगाची जन्म-मृत्यु नोंदणीच्या आधारावर नोंदणी करण्याचे आदेश शासनस्तरावरुन निर्गमित करण्याचे आदेश निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक -**

उपरोक्त बाब विचारात घेऊन राज्यातील ग्रामपंचायतींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत

१. १९९५ च्या अपंगाच्या पुनर्वसन कायद्यानुसार अपंगाच्या कल्याणार्थ जे महत्वपूर्ण बाबी लागू करण्यात आल्या आहेत. त्यानुसार जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत यांनी त्यांच्या अर्थसंकल्पाच्या ३% निधी अपंगांच्या पुनर्वसनाच्या/कल्याणासाठी खर्च करावा.

२. राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतींनी त्यांच्या गावातील त्यांच्या हद्दीतील सर्व अपंगांची विहित नमुन्यातील विवरण पत्रात नोंदणी करावी. सदरची नोंद करताना सक्षम अधिका-याचा अपंगाचा दाखला असणे आवश्यक आहे.

३. प्रत्येक ग्रामपंचायतीने अपंगाच्या नोंदणीबाबत दरवर्षी आढावा घेवून त्यांची नोंदणी अद्ययावत राहील याची काळजी घ्यावी. याकरीता अनंगांची नोंदणी ही ग्रामपंचायतीची कायमस्वरूपी अभिलेख राहील याबाबत ग्रामसेवकाची/ग्रामविकास अधिकारी यांनी कार्यवाही करून दक्षता घ्यावी.

४. अपंगाच्या कल्याणाकरीता खर्च करावयाच्या निधीबाबत ग्रामपंचायतीने याबाबत ग्रामसभेमध्ये विषय चर्चेस ठेवून ग्रामसभेची मान्यता घेण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०९१९१३२४५२००२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mallinath S Kalshetti

Digitally signed by Mallinath S Kalshetti
DN: CN = Mallinath S Kalshetti, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Rural Development Department
Reason: I am approving this document
Date: 2013.09.25 17:30:32 +05'30'

**डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई ४०० ०३२.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई ४०० ०३२.
४. मा. मंत्री ग्रामविकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई ४०१० ०३२.
५. मा. राज्यमंत्री ग्रामविकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई ४०० ०३२.
६. सर्व मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य.
७. मा.मुख्य सचिव यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८. सर्व विभागीय आयुक्त.
९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१०. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती.
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१२. सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत).
१३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
१४. सर्व मंत्रालयीन विभाग.
१५. ग्राम विकास व जलसंधारण विकास विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासन अधिकारी.
१६. निवड नस्ती- (पंरा-३ कार्यासन)